तक्रार आयटी क्र.4/2022
निशाणी – यु–9

## तक्रारदाराची स्वतःची साक्ष

**<u>तक्रारदाराची शपथेवर सरतपासणी – तक्रारदाराचे विधीज्ञ श्री. बी. आर. कावरे यांचेव्दारा</u>**

01. मी निशाणी **<u>नि. यु–9</u>** सोबत पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असून त्यामध्ये लिहलेला मजकूर बरोबर आहे.

**<u>तक्रारदाराची शपथेवर उलटतपासणी – श्री. वाय. आय. ठोले वकील जाब देणार क्र. 1 तर्फे</u>**

02. हे म्हणणे खरे आहे की, मूळ प्रकरणात माझी साक्ष झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रकरण क्र. रेफरन्स आयटी 89/2022 मी कामगार न्यायालय क्र. 1 मध्ये दाखल केले आहे. त्या प्रकरणाची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या प्रकरणात मी पक्षकार आहे. हे प्रकरण ईंडस टॉवर्स यांच्या विरूध्द आहे. या प्रकरणात टिमलिज यांना देखील प्रतिवादी करण्यात आले आहे. हे म्हणणे खरे आहे की, ईंडस टॉवर्स व टिमलिज यांच्यात कामगार पुरवण्याचा करार झालेला होता व सदर करार दि. 30.9.2017 रोजी संपुष्टात आला. हे म्हणणे खरे आहे की, पांडव ईलेक्ट्रिकल्स यांना मी या प्रकरणात प्रतिवादी केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझेत व टिमलिजमध्ये नोकर मालक संबंध होते. हे म्हणणे खरे नाही की, माझेत व ईंडस टॉवर्समध्ये नोकर मालक संबंध कधीही नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा पगार टिमलिज मार्फत व्हायचा, तेच प्रॉव्हिडंट फंडाचे रेकॉर्ड देखील ठेवायचे. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रातील संपुर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्राच्या कथनाच्या पुष्ठयर्थ माझेजवळ कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ईंडस टॉवर्सकडे कधीही काम केले नसल्याने त्यांनी मला कामावरून कमी केले असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मूळ प्रकरणात कामगार मालक संबंध आहेत की नाही हा मुद्दा अद्याप निकाली निघालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ईंडस टॉवर्स यांचे विरूध्द खोटी तक्रार दाखल केली आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>तक्रारदाराची शपथेवर उलटतपासणी – श्री. गाडेकर वकील जाब देणार क्र. 2 तर्फे</u>**

03. हे म्हणणे खरे आहे की, 30.9.2017 नंतर मी टिमलिजसोबत काम केलेले नाही. दि. 1.1.2022 रोजी कोण कॉंट्रॅक्टर होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, 12.1.2022 रोजी मी प्रताप ईंफोटेक यांच्याविरूध्द पोलिसात

तक्रार दिली होती.  माझेसह इतर सात कर्मचा–यांची भोपाळला बदली झाली होती याबाबत मला सांगता येणार नाही.  हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी माझे टिमलिज यांच्याविरूध्द कोणतीही मागणी नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मी टिमलिजचे नाव चुकीने घेतले आहे.  हे म्हणणे खरे नाही की, मी टिमलिजविरूध्द खोटी तक्रार दाखल केली आहे.  हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

उलटतपास : संपुर्ण

फेरतपास : काही नाही

**श्रवणोत्तर स्विकृत..**

स्वाक्षरीत/–

औरंगाबाद
दि. 19/06/2024

(एस.एस.सहस्त्रबुध्दे)
न्यायाधीश
2रे कामगार न्यायालय, औ.बाद.